सोलापूर आणि उस्मानाबाद जिल्हा परिसरातील वास्तूंवरील पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव

इ.स. 1317 ते 1707

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड,

च्या सामाजिक सामाजिकशास्त्रे विद्या शाखे अंतर्गत

इतिहास

या विषयातील पी.एच.डी पदवीच्या नियोजित संशोधनासाठी सादर करावयाचा

आराखडा

संशोधक विद्यार्थी

श्री. पटेल जैनुद्दीन अब्बासअली

इतिहास विभाग

एस.एस.ए.आर्टस् □ण्ड कॉमर्स कॉलेज, सोलापूर.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.लदाफ शफी खाजामैनोद्दीन

इतिहास विभाग

आझाद महाविद्यालय, औसा जि.लातूर

प्रस्तावना :-

सोलापूर व उस्मानाबाद हे महाराष्ट्रातील एक महत्वपूर्ण जिल्हे असून प्राचीन काळापासून या भागावर अनुक्रमे सातवाहन (इ.स.पूर्व 90 ते इ.स.300) चालूक्य (इ.स.760 पर्यन्त) राष्ट्रकुट (इ.स.973 पर्यन्त) नवोदीत चालुक्य (इ.स.1 1184 पर्यन्त) देवगीरीचे यादव (इ.स. 1318 पर्यन्त) यांचे आधिपत्य होते.

देवगीरीच्या यादवांच्या पाडावानंतर दक्षिणेवर खिलजी, तघलक या दिल्ली सुलतानांची राजवट अस्तित्वात आली सुलतानी सत्ते विरुध्द बंड करुन हसन गंगू बहामनी यांनी गुलबर्गा येथे बहामनी सत्तेची स्थापना केली. बहामनी राज्याच्या इ.स.1375 मध्ये पाडण्यात आलेल्या 4 विभाग (तर्फ) पैकी सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्याचा समावेश गुलबर्गा विभाग (तर्फ) मध्ये झाला. बहामनी सुलतान महमदशहा बहामनी यांच्या काळात या भागात कायदा व सुव्यवस्था निर्माण झाली व पुढील काळात विविध कारणामुळे किल्ले, प्रशासकीय वास्तू, राजवाडे, गढी, मस्जीद, दर्गाह, इदगाह, खानकाह, आशूरखाने, बारव, कालवे व जल वास्तूंची निर्मिती झाली.

कालांतराने बहामनी राज्य कमकुवत होवून ठिकठिकाणचे सुभेदार स्वतंत्र झाले. त्यातूनच विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, गोवळकोंडयाची कुतूबशाही, बिदरची बारिदशाही व खानदेशच्या इमादशाहीची स्थापना झाली. इ.स.1497 मध्ये त्यांच्यात झालेल्या वाटणीमध्ये सोलापूर व उस्मानाबाद हे अहमदनगरच्या निजामशाहीत समाविष्ट झाले.

सोलापूर व उस्मानाबाद या शहरांना राजधानीचे शहर होण्याचे सौभाग्य प्राप्त झालेले नसले तरी या शहरांच्या जवळच गुलबर्गा, बिदर, अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडा वगैरे ठिकाणी स्वतंत्र्य राज्ये निर्माण झाल्यामुळे त्यांच्या घडामोडीचा परिणाम सोलापूर व उस्मानाबाद वर झाला या भागात सोलापूर नळदुर्ग,अकलूज व परांडा येथे किल्ले असल्यामुळे राजकीय व लष्करीदृष्टया त्यांना

बरेच महत्व प्राप्त झाले. निरनिराळया राज्यातील वैरभावाचे चटके येथील नागरिकांना सोसावे लागले. विशेषत: अहमदनगरची निजामशाही व विजापूरची आदिलशाही यांच्या दरम्यान या प्रदेशात 1562 सालापर्यन्त सुमारे 60 वर्षे चुरशीच्या लढाया झाल्या.

लवकरच दिल्लीच्या मोगल बादशाहीच्या स्वा-या वाढत्या प्रमाणात सुरु होवून दक्षिणप्रांत मोगलांच्या ताब्यात आला औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर या भागावर मराठेशाही, पेशवाई व आसिफजाही सत्तेचा प्रभाव कमी अधिक प्रमाणात सुरु झाला.

विषयाची निवड:- अल्लाउद्दीन खिलजीच्या दक्षिण भारत विजयापासून औरंगजेब बादशाहाच्या मृत्यूपर्यन्त जवळजवळ 400 वर्षे या भागावर मुस्लीम सताधिशांचा अंमल होता. या काळात विविध कारणामुळे अनेक प्रशासकीय, लष्करी, धार्मिक, निवासी व जल वास्तूंची निर्मिती झाली. मुस्लीम सत्तेच्या आगमनाबरोबरच त्यांच्या पर्शियन स्थापत्य शैलीचा दक्षिणेत प्रवेश झाला. त्यांच्या पर्शियन स्थापत्य शैलीबरोबर भारतीय स्थापत्य शैलीच्या मिश्रणातून इंडो-पर्शियन स्थापत्य शैलीचा विकास झाला. सोलापूर व उस्मानाबाद जिलह्यामध्ये सोलापूर, अकलूज, नळदुर्ग व परांडा येथे किल्यांची उभारणी व पूर्नबांधणी झाली. याशिवाय अनेक मस्जीद, दर्गाह, खानकाह, आशूरखाने महाल जलमहाल यांची निर्मिती झाली. या वास्तूंवर पर्शियन वास्तूशैलीचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडल्याचे दिसून येते. हया वास्तू इतिलेखानाचे अमुल्य साधने आहेत. त्यामुळे त्यांचे जतन व संवर्धन होणे गरजेचे आहे. म्हणूनच मी सोलापूर व उस्मानाबाद येथील वास्तूंवर पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव ह्या विषयाची निवड केलेली आहे.

संशोधनाची आवश्यकता व महत्त्व:-

1) प्रस्तूत संशोधनामुळे दक्षिण भारतावरील मुस्लीम राजवटीचा विशेषत: सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरातील राजकीय घडामोडीवर नव्याने प्रकाश टाकला जाईल.
2) सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरातील विविध राजवटीची कारकिर्द व राजकीय घटना व नव्याने माहिती उजेडात येईल.
3) दक्षिण भारतातील स्थापत्य व पर्शियन स्थापत्य शैली यांच्या मिश्रणातून निर्माण झालेल्या नव्या बांधकाम शैलीची वैशिष्टये उजेडात येतील.
4) उत्तर भारतातील इंडो-पर्शियन स्थापत्य शैली व दक्षिण भारतातील इंडो-पर्शियन स्थापत्य शैली याची तुलना करता येईल.
5) सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरातील लष्करी व प्रशासकीय वास्तूंवरील पर्शियन बांधकाम शैलीच्या प्रभावाची माहिती मिळेल.
6) सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरातील धार्मिक वास्तूंवरील पर्शियन बांधकाम शैलीच्या प्रभावाची माहिती मिळेल.
7) सोलापूर व उस्मानाबाद परिसरातील निवासी वास्तूवरील पर्शियन बांधकाम शैलीच्या प्रभावाची माहिती मिळेल.
8) सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरातील जलवास्तूंवर पर्शियन बांधकाम शैलीच्या प्रभावाची माहिती मिळेल.
9) सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरातील वास्तूंवरील फारसी आलेख व शिल्पकामाची माहिती मिळेल.
10) सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरातील वास्तूच्या अभ्यासाने तत्कालीन राजवटी विषयी सविस्तर माहिती उजेडात येईल.

संशोधनाची उद्दीष्टये:-

1) दक्षिण भारतातील मुस्लीम राजवटी व त्यांच्या कारकिर्दीची माहिती मिळविणेस.
2) सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील लष्करी व प्रशासकीय वास्तूवरील पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव अभ्यासणे. उदा: किल्ले, कोर्टकचेरी, कारागृह, दारुगोळाकोठारे इ.
3) सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील धार्मिक वास्तूंवरील पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव अभ्यासणे. उदा:- मस्जीद, दर्गाह, खातकाह, आथूरखाने, समाधी इ.
4) सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवासी वास्तूंवरील पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव अभ्यासणे. उदा : महाल, वाडे, गढी इ.
5) सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील जलवास्तूंवरील पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव अभ्यासणे. उदा: जलमहाल, कालवे, कारंजे, बारव इ.
6) सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील जलवास्तूंवरील आलेख व शिल्प यांच्यावरील पर्शियन शैलीचा प्रभाव अभ्यासणे. उदा: फारसी शिलालेख, नक्षीकाम इ.

गृहीतके:-

1) मध्यकाळात सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरावर दिल्ली सुलतान (खिलजी तघलक) बहामनी, आदिलशाही, निजामशाही, मोगल, या सत्तांचा अंमल होता.
2) मध्यकाळात सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरात अनेक लष्करी व प्रशासकीय वास्तूंची बांधणी व पुर्नबांधणी झाली ज्यावर पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव होता.
3) मध्यकाळात सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरात अनेक धार्मिक वास्तूंची निर्मिती झाली ज्याच्यावर पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव होता.
4) मध्यकाळात सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरात अनेक निवासी वास्तूंची निर्मिती झाली ज्यावर पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव होता.
5) मध्यकाळात सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरात अनेक जलवास्तूंची निर्मिती झाली ज्यावर पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव होता.
6) मध्यकाळातील सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरातील वास्तूंवरील आलेख व शिल्पांवर पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव होता.

संशोधन पध्दती:-

प्रस्तूत संशोधनाचा हेतू सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरातील वास्तूंवरील पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव अभ्यासणे असल्यामुळे या संशोधनासाठी ऐतिहासिक पध्दतीची प्रामुख्याने मदत होवू शकेल. त्यासाठी प्रस्तूत विषयावरील प्राथमिक व दुय्यम साधने अभ्यासावी लागतील. संबंधीत कागदपत्रे मिळविण्यासाठी देशभरातील पुराभिलेखागार, भारतीय पुरातत्व खात्याचे अहवाल याचा उपयोग करण्यात येणार आहे. उत्तर भारतातील इंडो पर्शियन स्थापत्य व दक्षिण भारतातील इंडो-पर्शियन स्थापत्य यांच्या माहितीसाठी तुलनात्मक पध्दतीचा वापर केला जाईल. त्याबरोबरच ग्रंथालयीन पध्दतीचा संशोधनाचा वापर केला

जाणार आहे. संदर्भ ग्रंथ व साहित्य साधनांचा अभ्यास आशय व विश्लेषण पध्दतीने केला जाणार आहे.

संशोधनाची व्याप्ती:-

सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसरातील वास्तूंवरील पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव या संशोधनाची व्याप्ती केवळ सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसर एवढीच आहे. मध्यकाळात दक्षिण भारतातील महाराष्ट्र कर्नाटक व तेलंगणा राज्यात अनेक वास्तूंची निर्मिती झाली होती. ज्यावर पर्शियन बांधकाम शैलीचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव जाणवतो. परंतू मी माझ्या संशोधनाचे कार्यक्षेत्र केवळ सोलापूर व उस्मानाबाद जिल्हा परिसर निवडलेले आहे.

मध्यकाळातील मुस्लीम राजवटींचा दक्षिण भारतातील भाषा, कला, साहित्य, स्थापत्य, संस्कृती आहार यावर मोठ्या प्रमाणावर प्रभाव निर्माण झालेला असला तरी या संशोधनात केवळ वास्तूंवरील पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव याची निवड केली आहे. अल्लाउद्दीन खिलजीच्या राजवटी पासून औरंगजेब बादशहाच्या मृत्यू पर्यन्तचा कालावधी संशोधनासाठी निवडलेला आहे.

संभाव्य प्रकरण योजना

अनुक्रमणिका

प्रकरण	शिर्षक
1 ले	दक्षिण भारतातील मुस्लीम सत्तांचे आगमन व राजवट.
2 रे	दक्षिण भारतात इंडो पर्शियन बांधकाम शैलीचा विकास.
3 रे	सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील लष्करी व प्रशासकीय वास्तूंची निर्मिती व त्यावरील पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव.
4 थे	सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील धार्मिक वास्तूंची निर्मिती व त्यावरील पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव.
5 वे	सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील निवासी वास्तूंची निर्मिती व त्यावरील पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव.
6 वे	सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील जलवास्तूंची निर्मिती व त्यावरील पर्शियन बांधकाम शैलीचा प्रभाव.
7 वे	सोलापूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील वास्तूंवरील फारसी आलेख, नक्षीकाम व शिल्पकाम.
8 वे	निष्कर्ष.

संदर्भ ग्रंथसूची

1 शासकीय मुद्रणालय महाराष्ट्र राज्य गॅझीटीयर सोलापूर मुंबई

2 शासकीय मुद्रणालय महाराष्ट्र राज्य गॅझीटीयर उस्मानाबाद

	मुंबई	
3	माटे म.श्री.	मध्ययुगीन महाराष्ट्र भाग-1 महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुणे
4	कुंटे भ.ग.	अहमद नगरची निजामशाही संकेत प्रकाशन जालना
5	कुंटे भ.ग.	बहामनी राज्याचा इतिहास संकेत प्रकाशन जालना
6	खरे ग.ह.	महाराष्ट्राचा इतिहास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई
7	खरे ग.ह.	ऐतिहासिक फारसी कागदपत्रे खंड 1 ते 5 महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई
8	कुलकर्णी गो.ले.	मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई
9	माटे म.श्री.	मध्ययुगीन महाराष्ट्राचा सामाजिक आणि सांस्कृतीक जीवन
10	मोगल दरबारची बातमीपत्रे	सेतू माधवराव पगडी महाराष्ट्राचा इतिहास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई

उर्दू भाषेतील साधने

1	अहम बशीरुद्दीन दहेली	वाकियाते मामलेकाते बिजापूर खंड तीसरा कर्नाटक उर्दू अकादमी
2	आझाद गुलाम अली	खजाने आग्रा

		प्रकाशन बिलग्रामीया
3	नसीम मन्नान	शोलापूर तारीख के आईनेमे
		इस्लाही व फलाही तंजीम शोलापूर

इंग्रजी संदर्भग्रंथ

1	G.S. Sardesai	New History of the Marathas Vol I Bombay-1964
2	Nayeem M.A.	External Relations Farishtath
3	Joshi P.M.	Asab Baigs Mission to Bijapur
4	Jafar Sayyed & Gyan Chand	Tarikh-e-Adab-e Urdu Val II New Delhi
5	Govt. Of Maharashtra	Usmandabad Dist. Gazette
6	Govt. Of Maharashtra	Solapur Dist. Gazette
7	Bhandarkar R.J.	Early History of Deccan Calkatta 1978
8	Chitnis K.M.	Medieval India History Attantic Publication & Distributor 2003
9	Joshi P.M. & Shewani H.K.	History of Medieval Deccan A.P. Publication Puna 1989
10	Ab. Gani Imaratwale	History of Bijapur Sooba Islamic Wonders Bureajs Publication 2007